महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-९ अंक-३ एप्रिल-मे -२०१५

माझ्या कर्मचारी बंधू आणि भगीनींनो,

मला आशा आहे की, आपण सर्वांनी वर्ष २०१४-२०१५ चे ठरवून घेतलेले कामगिरीचे लक्ष प्राप्त केले असतीलच. तसेच नविन वर्ष २०१५-२०१६ करिता कामगिरीचे नियोजन आपल्या वरिष्ठांकडून करून घेतले असेल. व्यवस्थापनात नियोजन व आढावा हे अत्यंत महत्वाचे घटक ठरतात. या मुळे आपल्याला आपली कृती नेहमी रूळावर ठेवण्यास मदत होते.

Failing to Plan is Planning to Fail असे याकरिताच म्हटले जाते. नियोजनाच्या त्रुटींचा बोजा अवाढव्य असतो. एखाद्या गोष्टीची पुर्नरचना करण्यास किती श्रम लागतात हे आपल्या सर्वांना माहिती आहे. नियोजनामुळे सर्व कर्मचारी /अधिकारी हे संस्थेच्या ध्येय/उद्देशांशी एकरूप होतात व या संघटीत शक्तीची संस्थेला चांगली उपयुक्तता लाभते. आपल्याकडे असलेले विभाग उदा. STU, Projects, O&M, MSLDC, CPA, F&A आणि HR एकमेकांशी प्रत्यक्ष / अप्रत्यक्षपणे जोडलेले आहेत. कोणताही विभाग स्वतंत्र आपली कामगिरी बजावू शकत नाही. त्याकरिता संस्था समन्वय साधून आपली ध्येय धोरणे आखत असते.

विद्युत क्षेत्रात बदलांचे वारे वेगाने वाहत असल्याचे आपण पाहत आहोत. या बदलांना आपल्यामध्ये अंर्तभूत करून आपली क्रियाशक्ती वाढविणे महत्वाचे असते. त्याकरिता आपण तत्पर, धाडसी व मेहनती राहणे गरजेचे ठरते. भूतपूर्व झालेल्या चांगल्या कामगिरीवर समाधानी राहून आपल्याला जडत्व येवू दयायचे नसते. तर अजून खूप काही सुधारणा / बदल आपल्या अंर्तगत प्रणालीमध्ये करावे जेणेकरून आपण अधिक चांगली उज्वल कामगिरी करू व याकरिता आपण सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे.

पावसाळा तोंडावर आलेला आहे. त्याकरिता तोंड देण्यासाठी आपली प्रणाली सक्षम केली आहे का ? याचा नियमित आढावा घेणे गरजेचे आहे. प्रणालीमध्ये Critical Path / Weak Link कोठे आहेत ते ओळखून ठेवणे व त्यावर लक्ष केंन्द्रीत करणे व त्यात सुधारणा करणे अत्यंत महत्वाची बाब आहे. आपणांस लागणाऱ्या साधनांची उपलब्धता आपल्या वरिष्ठांच्या मार्गदर्शनातून व सहकार्यातून करून घेणे हा सुध्दा आपल्या नियमित कार्यशैलीचा एक भाग असावा.

आपल्या खर्चावर नियंत्रण ठेवणे हा सुध्दा अत्यंत महत्वाचा घटक आहे. साधनांची उपलब्धता करण्याकरिता कमीत कमी खर्च व त्यातून निर्माण होणारे फायदे लक्षात घेणे गरजेचे आहे. उत्तम गुणवत्तेशी कुठलीही तडजोड न करता कमी खर्चात काम करणे हीच खरी कार्यकुशलता आहे व त्यामध्ये आपण सर्वांनी



राजीव कुमार मित्तल
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

निपूण होणे गरजेचे आहे.

पावसाळ्यात Availability कायम राहील व Interruptions होणार नाहीत. या करिता नियमित काळजी घेतली पाहिजे. हे करत असताना कोणत्याही प्रकारच्या दुर्घटना / अपघात होणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे हे पाहणे सुध्दा तितकेच महत्वाचे ठरते.

मला आशा आहे आपण सर्व आपल्या संस्थेला आपआपल्या कामगिरीच्या बळावर पुढच्या पातळीवर नेण्यास सहकार्य कराल.

शुभेच्छा सह!

**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## २२०/१३२/३३ के. व्ही. कोपरगांव उपकेंद्राचे उद्घाटन समारंभ



दि. २६.०४.२०१५ रोजी मा. चंद्रशेखर बावनकुळे, ऊर्जा मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते २२०/१३२/३३ के. व्ही. कोपरगांव उपकेंद्राचे उद्घाटन झाले. सदर उपकेंद्रामुळे अहमदनगर जिल्हयातील कोपरगांव, राहाता व नाशिक जिल्हयातील येवला तसेच औरंगाबाद जिल्हयातील वैजापुर तालुक्यातील गावांना योग्य दाबाने व अखंडित वीज पुरवठा होईल. तसेच सध्याचे २२० के. व्ही. बाभळेश्वर उपकेंद्रावरील भार कमी होऊन कोपरगांव, येवला व वैजापुर १३२ के. व्ही. उपकेंद्रे नवीन होणाऱ्या २२० के. व्ही. कोपरगांव उपकेंद्राला जोडण्यात येणार आहेत. योग्य दाबाने व अखंडित वीज पुरवठा होण्याच्या दृष्टीने ३३ के. व्ही. ची कोळपेवाडी, चास, कान्हेगांव, राहाता, पोहेगांव,दहेगांव, बोलका, शिर्डी इत्यादी उपकेंद्राना या उपकेंद्रातून वीज पुरवठा होणार आहे. सदर उद्घाटन समारंभ कार्यक्रमास मा. राम शिंदे, गृहमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री अहमदनगर जिल्हा यांचे मार्गदर्शन लाभले.

या प्रसंगी मा. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (संचलन) महापारेषण मुंबई, मा. भाऊराव राऊत, मुख्य कार्यकारी अभियंता, महापारेषण नाशिक, मा. एस. बी. रंगारी, मुख्य अभियंता, महावितरण नाशिक, मा. माणिक गुट्टे, अधीक्षक अभियंता, नाशिक. याबरोबरच अहमदनगर जिल्हयातील कार्यकारी अभियंते व वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संचालक (प्रकल्प) पदी श्री. रविंद्र चव्हाण यांची नियुक्ती



श्री. रविंद्र दिनकरराव चव्हाण यांची संचालक (प्रकल्प) या पदावर नेमणूक दि. ०५ मे २०१५ रोजी करण्यात आली आहे.

यापुर्वी श्री. चव्हाण हे मुख्य अभियंता (प्रकल्प-कंत्राटी व अनुश्रावक) या पदावर कार्यरत होते. याबरोबरच श्री. चव्हाण यांच्याकडे कार्यकारी सचांलक (प्रकल्प), महापारेषण या पदाचा अतिरिक्त प्रभार होता.

आपल्या सर्वांकडून त्यांच्या नविन कार्यास हार्दिक शुभेच्छा !

## १ मे - कामगार दिन

कामगार जरी Bottom of Pyramid असला, तरिही तो सर्व थरातील लोकांच्या गरजा भागविण्याचे काम करत असतो. जोखीम, अंग मेहनत, शारिरीक श्रम, दिवसपाळी, रात्रपाळी त्या ठिकाणी असलेल्या Working Conditions या मधुन मार्ग काढत तो मालकाची उत्पादकता वाढविण्यास प्रयत्नशील असायचा.

अनेक वेळा जास्त नफा मिळविण्याच्या मोहात कामगारांचे शोषण केले जात असायचे. अपघात, बेकारी, दारिद्र्य यांनी कामगार वर्ग त्रस्त झालेला असायचा.

प्रगतीचे आणि विकासाचे वारे जसजसे प्रबळ होत गेले तसतसे Society अधिक प्रगल्भ होत गेली. कामगारांच्या अस्तित्वाची जाणीव समाजाला होत गेली. अनेक संघटना, समाजसुधारक, पुढारी तसेच योजना व त्यांची अमंलबजावनी यांनी त्यांच्या विकासास हातभार लावला. १ मे कामगार दिन त्यांच्या स्मरणा करिता साजरा केला जातो.

महापारेषण कंपनीत अनेक कार्यालयात १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिन म्हणून साजरा करण्यात आला.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे एप्रिल ते मे २०१५

**नियुक्ती-**

| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| | निरंक | - | - | - |

**निवृत्ती-**

| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. प्रभाकर रामराव देवरे | मुख्य अभियंता | पुणे, परिमंडळ | ३०.०४.२०१५ |
| २. | श्री. विष्णु अण्णाजी शेंडे | उपमहाव्यवस्थापक (मा.सं.तां.) | सांघिक कार्यालय, मुंबई | ३०.०५.२०१५ |
| ३. | श्री. प्रदिप लक्ष्मीकांत लाखकर | अधि. अभियंता (स्थापत्य) | अ.उ.दा. बां. नि.सुं.मंडळ, अमरावती | ३०.०५.२०१५ |

## ERP-SAP Competency Center चे उद्घाटन



ERP-SAP Competency Center चे उद्घाटन करतांना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

दि, २४.०४.२०१५ रोजी महापारेषणच्या प्रकाशगंगा या मुंबईतील मुख्य कार्यालयात ERP-SAP Competency Center या विभागाचे उद्घाटन श्री. राजीवकुमार मित्तल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण यांच्या करकमलाने झाले. यावेळी श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (संचलन), श्री. एस. टी. शिंदे, मुख्य अभियंता (मा. सं. वि.), इतर वरिष्ठ अधिकारी व ERP विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उद्घाटन



ERP-SAP Competency Center येथे मार्गदर्शन करतांना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

समारंभाच्या कार्यक्रमानंतर मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण तसेच श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (संचलन), यांचे स्वागत विभागाच्या वतीने श्री. एस. टी. शिंदे, मुख्य अभियंता (मा. सं. वि.) यांनी पुष्पगुच्छ देवून केले. मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण यांना विभागाची संपूर्ण माहिती करून देण्यात आली. या नंतर मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. याबरोबरच कार्यक्रमाची सांगता झाली.

## AMBITION EXPRESS चा प्रकाशगंगेत समारोप




महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यां सोबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

दि. २४.०४.२०१५ THE AMBITION EXPRESS या SAP VISION BUS चे प्रकाशगंगा या महापारेषणच्या सांघिक कार्यालय परिसरात आगमन झाले. या उपक्रमांतर्गत SAP च्या विविध उत्पादनांची माहिती देशभरात पोहचविण्याचे कार्य या माध्यमातून साकारले गेले. याच उपक्रमाचा भाग व देशभरातील परिक्रमेचा अंतिम टप्पा व या उपक्रमाच्या समारोप समारंभ कार्यक्रमाचे उद्घाटन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राजीवकुमार मित्तल यांच्या



SAP बाबत माहिती घेतांना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व वरिष्ठ अधिकारी वर्ग

शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी संचालक (संचलन) श्री. ओमप्रकाश एम्पाल, श्री. एस. टी. शिंदे, मुख्य अभियंता (मा. सं. वि.), SAP चे प्रकल्प अधिकारी व सहाय्यक अधिकारी, या बरोबरच महापारेषण चे वरिष्ठ अधिकारी वर्ग व इतर कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे महापारेषणच्या अधिकारी व कर्मचारी यांना SAP BUS मध्ये दृकश्राव्य माध्यमातून SAP बद्दल माहिती देण्यात आली. SAP चे महत्त्व, उपयोगिता, कार्यशैली आणि दैनंदिन कामकाजातील वापर याची तोंड ओळख ही उपस्थितांना करून देण्यात आली. या उपक्रमाचा लाभ महापारेषणच्या सांघिक कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी दिवसभराच्या कालावधीत घेतला.

## तळदंगे येथे नुतन अभियंत्यांचे प्रशिक्षण शिबिर संपन्न




तळंदगे येथील प्रशिक्षण शिबिराचा उद्घाटन समारंभ

दि. ०६.०५.२०१५ महापारेषण कंपनीमध्ये पुणे आणि कराड परिमंडळातंर्गत नव्याने रूजु झालेल्या २६ महिला अभियंत्याच्या ४थ्या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन तळंदगे येथे दि. ०६.०५.२०१५ पासून करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन कराड परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. गणपत मुंडे यांच्या हस्ते दीप प्रज्वल करून झाले. या प्रशिक्षण शिबिराचा कालावधी हा दि. ०६.०५.२०१५ ते दि २०.०५.२०१५ होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. संदीप हाके, अधीक्षक अभियंता (स्थापत्य), कोल्हापूर यांनी केले.




नुतन अभियंत्यासह अधिकारी वर्ग यांचे सामुहिक छायाचित्र

प्रास्ताविकामध्ये त्यांनी २०१० पासून तळंदगे प्रशिक्षण केंद्राच्या कामगिरीचा उहापोह उपस्थितांसमोर केला. तसेच २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात हाती घेतल्या जाणाऱ्या कामांची सविस्तर माहिती सादर केली.

या प्रसंगी मुख्य कार्यालयाचे अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण), श्री. निंबाळकर यांनी प्रशिक्षणाचे महत्व याविषयी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. यावेळी सर्व नुतन अभियंत्याना गुलाब पुष्प देवून स्वागत करण्यात आले. तसेच सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## तळंदगे येथे १३२ के. व्ही. डेमो बे चे भूमिपुजन व परिसरात वृक्षारोपण



१३२ के. व्ही. डेमो बे चे भूमिपुजन

दि. ०६.०५.२०१५ तळंदगे येथील प्रशिक्षण केंद्र परिसरात १३२ के. व्ही. डेमो बे चे भूमिपुजन व वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. गणपत मुंडे, मुख्य अभियंता, कराड परिमंडळ यांच्या हस्ते भूमिपुजन व श्रीफळ अर्पण करून करण्यात आले. या बरोबरच मुख्य अभियंता यांच्या हस्ते प्रशिक्षण केंद्राच्या परिसरात वृक्षरोपण करण्यात आले. या सोबत उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांनीही प्रशिक्षण केंद्र परिसरात वृक्षरोपांचे रोपण करून



तळंदगे प्रशिक्षण केंद्र परिसरात वृक्षारोपण

वृक्षारोपण कार्यक्रमात उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. या कार्यक्रमास पारेषणचे विविध पदासिन अधिकारी, नुतन प्रशिक्षणार्थी अभियंत्या व इतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर मुख्य अभियंता, कराड परिमंडळ, श्री. गणपत मुंडे व अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण), श्री. निंबाळकर यांनी नुतनीकरण केलेल्या प्रशिक्षणार्थी वसतिगृहाची पाहणी करून प्रशिक्षणार्थी वसतिगृहामध्ये सर्व आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

## ११० के. व्ही. उपकेंद्र विश्रामबाग येथे Know Your Sub-Station प्रशिक्षण उपक्रम





दिनांक २३.०३.२०१५ रोजी अउदा बांध. नि. संवसु परिमंडळ, कराड अंतर्गत Know Your Sub-Station हा प्रशिक्षण कार्यक्रम महापारेषणच्या विश्रामबाग जि. सांगली येथील ११० के. व्ही. उपकेंद्र येथे प्रथमच राबविण्यात आला. सदर प्रशिक्षण उपक्रमांतर्गत उपकेंद्रातील Disaster Management, Battary Room, AC/DC Supply System, Relay & Control Panel, Switch Yard या उपकरणांची कार्यप्रणाली व देखभाल यांची माहिती अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात आली. याबरोबरच उपकेंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करून त्यांच्या शंकानिरसन उपस्थित संबंधित विभाग प्रमुखांकडून करण्यात आले. सदर कार्यक्रम हा मा. श्री. जी. टी. मुंडे, मुख्य अभियंता, अउदा. बांध. नि. संवसु. परिमंडळ, कराड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

सदर प्रशिक्षणास मा. श्री. अनिल कोळप, अधीक्षक अभियंता, मा. श्रीमती शिल्पा कुंभार अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंते श्री. सी. एल. कोळी, श्री. अशोक ढापरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंते, श्री. चव्हाण, श्री. गौड, श्री. जाधव, श्री राजोबा, श्री. बावधनकर, श्री. कुंभार व इतर अभियंते त्याबरोबरच वाहिनी कर्मचारी उपस्थित होते.

सदर प्रशिक्षणाची संकल्पना श्री. व्ही. बी. कुलकर्णी, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, तळंदगे प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर यांनी साकारले. सदर प्रशिक्षण उपक्रमाद्वारे ११० के. व्ही. उपकेंद्र विश्रामबाग येथील सर्व कर्मचाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## जगत्ज्योती श्री. महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी



दि. ०५.२०१५ रोजी महापारेषणच्या प्रकाशगंगा या मुख्य कार्यालयात जगत्ज्योती श्री.महात्मा बसवेश्वर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. ओ. के. एम्पाल, संचालक (संचलन) हे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगत्ज्योती श्री.महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण व दीप प्रज्वलित करून झाली. यानंतर उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाने जगत्ज्योती श्री. महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण करून वंदन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालक यांनी आपल्या प्रास्ताविकातून जगत्ज्योती श्री.महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन कार्याचे व त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती उपस्थितांसमोर मांडली. जगत्ज्योती श्री.महात्मा बसवेश्वर यांचा सर्वधर्म समभाव याबरोबरच स्त्री समानतेची शिकवण देणारे ते आद्य समाजसुधारक व संत महात्मा होते. अशी माहिती कार्यक्रमाच्या सुत्रसंचालकाने करून दिली. याबरोबरच कार्यक्रमाची सांगता झाली.



# औरंगाबाद परिमंडळा अंतर्गत ९ वा वर्धापनदिन दोन ठिकाणी साजरा






औरंगाबाद परिमंडळा अंतर्गत ९ वा वर्धापनदिन परिमंडळात दोन ठिकाणी साजरा करण्यात आला औरंगाबाद परिमंडळाचे भौगोलीक क्षेत्र हे मोठे असल्याने नांदेड, बीड, परभणी, लातुर या विभागासाठी २ मे रोजी कुसुम सभागृह, नांदेड येथे वर्धापनदिनाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री.शशांक जेवळीकर, प्रभारी मुख्य अभियंता हे होते. या कार्यक्रमास मुख्य अभियंता महावितरण हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते तर श्री. मिलींद बनसोडे, कार्यकारी अभियंता (अउदा बांधकाम विभाग ) नांदेड यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले .

नांदेड येथे झालेल्या या वर्धापनदिन सोहळ्यात प्रथम स्वागत “आमचं कोण बघणार” या मुक्त नाटिकेचे सादरीकरण करण्यात आले तर द्वितीय सत्रात संगीत मनोरंजनाद्वारे अधिकारी व त्यांचे कुटुंबीय यांनी समारंभाचा आनंद घेतला.

सदरील कार्यक्रमास सर्व अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, हे उपस्थित होते. दि. २२.०५.२०१५ रोजी औरंगाबाद परिमंडळ अंतर्गत औरंगाबाद व जालना या दोन्ही जिल्हासाठी वर्धापनदिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. श्री. नितीन कांबळे, सहा. व्यवस्थापक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सदरील कार्यक्रमातंर्गत अमृता पाटील प्रस्तुत “स्वरजल्लोष” या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अमृता पाटील या Etv च्या गौरव महाराष्ट्राचा या कार्यक्रमात होत्या तसेच त्यांनी पंडित ह्रदयनाथ मंगेशकर, उषा मंगेशकर, अशा अनेक मान्यवंरासोबत काम केलेले आहे.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्य अभियंता श्री. मुंडे साहेब, यांनी भुषविले तर या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन श्री.मस्के साहेब, मुख्य अभियंता (पुणे परिमंडल) यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमास सर्व अधीक्षक अभियंता, सहा.महाव्यवस्थापक (मासं/विवले), कार्यकारी अभियंता तसेच सर्व अधिकारी/कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबिय मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती मंजुषा दुसाने यांनी केले. सदरील कार्यक्रम इन्स्टीट्यूट ऑफ इंजिनिअर्स येथे घेण्यात आला. दोन्ही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# गौरव ध्वजनिधी संकलनात महापारेषण अव्वल



दि ३०.०४.२०१५ रोजी मा. अशोक साळुंखे यांचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देवून गौरव करण्यात आला. राष्ट्रीय स्तरावर माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियांकरिता मदत म्हणून ध्वजनिधी संकलित करण्यात येतो. हा निधी राष्ट्रीय स्तरावर त्या त्या जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत संकलित केला जातो. तर राज्यपातळीवर हे काम प्रत्येक सरकारी व निम्नसरकारी कार्यालयात नियुक्ती असलेल्या अधिकाऱ्याकडे या कार्याची जबाबदारी दिलेली असते. कार्यालयातील सर्वच अधिकारी व कर्मचारी यांनी या कार्यासाठी सढळ हाताने मदत निधी दिला. हा निधी संकलित करणे व तो जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सुपूर्द करण्याचे कार्य सांघिक कार्यालयातर्फे श्री. अशोक साळुंखे यांनी पार पाडले. या करिता महाराष्ट्र शासनाच्या सुचनेने व जिल्हा सैनिक अधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांच्या वतीने ध्वजनिधी संकलनाच्या उत्कृष्ट कार्याबद्दल मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या हस्ते श्री. अशोक साळुंखे यांचा सत्कार करण्यात आला. या उत्कृष्ट कार्याबद्दल श्री. साळुंखे यांना मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.

## India-Tech Triple Expo Exhibition मध्ये महापारेषणचा उस्फुर्त सहभाग



दि २८.०४.२०१५ हॉटेल द ललित या ठिकाणी आयोजित India-Tech Triple Expo Exhibition या उपक्रमात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने सहभाग घेतला होता.

या तीन दिवशीय India-Tech Triple Expo Exibition दि. २८.०४.२०१५ ते दि. ३०.०४.२०१५ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. सदर उपक्रमात देशभरातील विविध उर्जा विषयक उद्योग, सेवा पुरवठादार, महापालिका व तंत्रज्ञान समुहांनी सहभाग घेतला होता. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून महापारेषण सांघिक कार्यालया मार्फत या प्रदर्शन



उपक्रमात सहभाग नोंदवला होता. सदर उपक्रमास महापारेषणच्या विविध विभागातील अधिकारी यांचे योगदान लाभले. यात अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) श्री. अनिल निंबाळकर, सहाय्यक प्रणाली विश्लेषक श्री. श्रिनिवास चाटला, सहाय्यक प्रणाली विश्लेषक श्री. दिग्विजय मिस्त्री, उपकार्यकारी अभियंता श्री. उन्मेश माने, कु. रेणूका नाटके व कु. संध्या कळंबकर यांनी सदर उपक्रमात सक्रिय सहभागी होवून महापारेषण विषयीची माहिती अभ्यांगताना करून दिली.

## सांघिक कार्यालयात महाराष्ट्रदिन मोठ्या उत्साहात साजरा



दि. ०१.०५.२०१५ सांघिक कार्यालयात ५५ वा महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दि ०१ मे, १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची निर्मीती झाली. १मे, हा दिवस दरवर्षी महाराष्ट्र दिन म्हणून साजरा करण्यात येतो. याबरोबरच आजचा दिवस हा आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून ही साजरा करण्यात येतो.

सांघिक कार्यालयात महाराष्ट्रदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन ) श्री. ओ. के. एम्पाल, हे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाची सुरवात ध्वजारोहणाने झाली. याप्रसंगी श्री ओ. के. एम्पाल, संचालक (संचलन) यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून झाली. ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी सुरक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी संचलन करून मानवंदना दिली. या कार्यक्रमास महापारेषणचे अनेक मान्यवर, वरिष्ठ अधिकारी व इतर कर्मचारी उपस्थित होते.




४० व्या AIESCB स्पर्धेत सहभागी झालेला महिला खेळाडुंचा संघ

## "प्रकाशगंगा" येथे टेबल टेनिस व कॅरम स्पर्धा संपन्न



टेबल टेनिस स्पर्धेतील अंतिम विजेते खेळाडू

दि. १६.०५.२०१५ महापारेषण कला, क्रिडा व मनोरंजन क्लब, मुंबई यांच्या तर्फे सांघिक कार्यालय, प्रकाशगंगा, वांद्रे येथे टेबल टेनिस व कॅरम स्पर्धा संपन्न

प्रकाशगंगा, सांघिक कार्यालय, वांद्रे, मुंबई येथे महापारेषणच्या प्रकाशगंगा कार्यालयातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या कला व क्रिडा गुणांना वाव व प्रोत्साहन मिळावे याकरिता महापारेषण कला, क्रिडा व मनोरंजन क्लब, मुंबई ची स्थापना करण्यात आली असून या क्लबच्या माध्यमातून प्रकाशगंगा या महापारेषणच्या सांघिक कार्यालयात दि, ०५.०५.२०१५ ते



कॅरम स्पर्धेतील अंतिम सामन्यातील क्षणचित्र

दि.१६.०५.२०१५ या टेबल टेनिस व कॅरम स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पुरूष व महिला गटातील खेळाडुंनी उत्स्फुर्त सहाभाग नोंदवला. बारा दिवस चाललेल्या या स्पर्धेत टेबल टेनिस एकेरी पुरूष गटात श्री. सुमंत नाईक, एकेरी महिला गटात कु. गार्गी देशपांडे तर दुहेरी पुरूष गटात श्री. सुरेंद्र भंडारी व श्री. प्रफुल्ल अवघड यांनी अनुक्रमे स्पर्धेच विजेतेपद पटकावले. कॅरम या स्पर्धेत एकेरी पुरूष श्री. सुशिल घाडगे तर एकेरी महिला गटात श्रीमती सीमा जाधव यांनी जेतेपदावर आपला शिक्का मोर्तब केला.

## Ideas Create Wealth, Values Preserve It

काळ साक्षी आहे की परिवर्तन हा एकमेव चिरंतन घटक आहे. सृष्टीचे चक्र जो पर्यंत सुरू आहे तो पर्यंत परिवर्तन होत राहणार. किंवा या परिवर्तन घटकामुळे सृष्टीचे चक्र आजतागत सुरू आहे व पुढे ही सुरू राहील.

No One is Perfect and Nothing is Permanent. There is Always Scope for Improvement and Changes. आजच्या काळात परिवर्तनाचा वेग वाढलेला आपण पाहतो. एकेकाळी Camera च्या फिती (Film) वापरल्या जात होत्या, आता त्या कालबाह्य झाल्या आहेत. Floppy / CD च्या ठिकाणी SD Cards आलेले आहेत. काही परंपरा सुद्धा बदलल्या आहेत. हे सर्व परिवर्तित होताना आपण पाहतो. मात्र मुल्य परिवर्तित झालेले आपण




पाहत नाही. समानता, बंधुता, सहकार्य, अहिंसा, सत्य किंवा प्रामाणिकता, न्याय या मध्ये बदल झालेला आपल्याला दिसत नाही. ही तत्वे वर्षानुवर्षे तशीच आहेत. किंबहुना त्याची जोपसना केली जाते. जगातील सर्व विधी नियमांची जननी ही मुल्य आहेत.

काही बांधव प्रलोभनाला बळी पडुन ह्या मुल्यांशी तडजोड करतात, मात्र त्यामुळे ते अडचणीत येवू शकतात. किंवा काहीतरी चुकीचे केले आहे याची खंत त्यांच्या मनाला सतत पडत असते. कोणाला न्याय मिळवून देण्याकरिता कोणावर अन्याय होणार नाही याची खबरदारी घेणे गरजेचे राहते. विकारांवर विजय मिळवता आला पाहिजे तरच एक समृद्ध जीवन जगण्याचा आनंद आपण घेवू शकतो. आपणास शांत झोप लागु शकते. आपले जिवन सुखी व समाधानी होवू शकते.

कोण म्हणतो सरळमार्गी माणूस मोठा होवू शकत नाही. तो मोठा होवू शकतो आज त्याला थोडा वेळ लागेल व कष्ट करावे लागतील. जर कमी वेळात व कमी कष्ट करून मोठ व्हायचे असेल तर सदाचाराला बाजुला ठेवून, दुसऱ्याचे हक्क मारून, अन्याय करून मोठ व्हावं लागेल. ही धारणा चुकीची आहे, दुराचारी राहून मोठे होता येईल ही मात्र त्यांस सुख व समाधान मिळेल याची शाश्वती नाही. त्यामुळे नितीमुल्यांच्या आधारावर झालेली प्रगती सुखदायक ठरते.

चला आपण सर्व या मुल्यांना जोपासन्यास कटीबद्ध होवुया.

**From the Desk of ED (HR)**

**संपादक : श्री.संदीप नरडेले, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)**
**E-mail : prohr@mahatransco.in**
**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO **For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts :** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.